**दिव्या स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण व्हावे यासाठी भाजपचे रोहिदास मुंडे घेणार देवेंद्र फडणवीस यांची भेट**


# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

facebook page /Diwanews


दिवा:–शहरासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण करण्यात यावे या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी दिवा विभागाच्या वतीने उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लवकरच भेट घेतली जाणार असल्याचे दिवा भाजप मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी सांगितले.

(संबंधित वृत्त पान ५ वर)

वर्ष–२ ■ अंक–३ ■ सोमवार, २२ ऑगस्ट २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# गणेशोत्सवापूर्वीच ठाण्यात स्वाइन फ्ल्यूचे सावट

**ठाणे :** एकीकडे गणेशोत्सव तोंडावर असताना ठाणे जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यूच्या रुग्ण संख्येत वाढ होऊ लागली आहे. त्यातच, या आजाराने दगावणाऱ्यांची संख्याही वाढताना दिसत आहे. मागील तीन दिवसात तब्बल पाच जणांचा मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा १४ वर पोहोचला आहे. पाच जणांपैकी तिघे ठाणे तर दोघे कल्याण डोंबिवली या महापालिका हद्दीतील आहेत.१४ पैकी १३ रुग्ण त्या दोन महापालिका हद्दीत दगावले आहेत. दरम्यान २१८ रुग्ण उपचार घेत घरी परतले असून १७० जण रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

मागील दोन वर्षापासून कोरोनाचा प्रादुर्भावाचा धोका कमी होत नाही, तोच दुसरीकडे साथीच्या आजारांनी डोकेवर काढले असल्याचे चित्र दिसून येत आहे. ठाणे जिल्ह्यात मागील तीन दिवसांमध्ये रुग्ण संख्येत ५२ ने वाढ झाल्याने रुग्णांचा आकडा ४०२ झाला आहे. तर, या आजाराने मृत्यू होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत ५ ने वाढ झाली आहे. या तीन दिवसात ठामपा हद्दीत ३९ रुग्णांची वाढ झाल्याने येथील एकूण रुग्णांची संख्या २९१ इतकी झाली आहे. तर ३ जणांच्या मृत्यूची नोंद झाल्याने मृतांचा आकडा ८ झाला आहे. त्यापाठोपाठ, कल्याण–डोंबिवलीत ६ रुग्णांची वाढ झाल्याने रुग्णांची संख्या ५६ वर गेली असून २ जणांच्या मृत्यूची नोंद झाल्याने मृतांचा आकडा ५ इतका झाला आहे. नवी मुंबई ३३ , मिरा भाईंदर ६, ठाणे ग्रामीण ४, बदलापूर ८ आणि अंबरनाथमधील एका रुग्णाचा समावेश आहे. तर जिल्ह्यात सध्याच्या घडीला ४०२ रुग्णांपैकी १७० रुग्णांवर उपचार सुरु आहेत. तर, उर्वरित २१८ रुग्णांना उपचारानंतर घरी सोडण्यात आल्याचे माहिती जिल्हा आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

| संस्था | रुग्णांची संख्या | मृत्यू संख्या |
|---|---|---|
| ठामपा | २९१ | ०८ |
| कल्याण डोंबिवली | ०५६ | ०५ |
| उल्हासनगर | ००० | ०० |
| मीरा भाईंदर | ००६ | ०० |
| भिवंडी | ००० | ०० |
| नवी मुंबई | ०३३ | ०० |
| कुळगाव बदलापूर | ००८ | ०० |
| अंबरनाथ | ००१ | ०१ |
| ग्रामीण | ००४ | ०० |
| एकूण | ४०२ | १४ |


सर्व आजारांवर उपचार
सर्व सोयी- सुविधांनी सुसज्ज

डॉ.महाजन यांचे
Ace Hospital

सिद्धीविनायक गेट जवळ, दिवा-आगासन रोड, दिवा



## टोरेन्ट पॉवर लिमिटेड

सूचना

**गणेशोत्सवात विद्युत व्यवस्था व सुरक्षा संबंधित माहिती**

१. गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या जोडणीसाठी ग्राहक सेवा केंद्रातुन अधिकृत मिटर घ्यावे.

२. विद्युत संचमांडणी मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करुन घ्यावी. तसेच संपूर्ण वायरिंग मध्ये कोणताही जोड (जॉइंट) नाही ह्याची दक्षता घ्यावी.

३. गणेशोत्सवासाठी मांडण्यात आलेल्या मंडपाचे निम्नदाब/उच्चदाब विद्युत वाहीनी/ट्रान्सफॉर्मर पासून सुरक्षित अंतर ठेवावे.

४. कृपया कोणत्याही परिस्थितीत अप्रशिक्षीत अननुभवी वायरमन कडुन सजावटीसाठी लागणारी अनधिकृत धोकादायक विजेची जोडणी करून घेऊ नये.

५. विद्युत उपकरणे, प्लग व सॉकेटसाठी योग्य अर्थिंग आहे याची खात्री करुन विद्युत अपघात टाळावा.

६. अपघात टाळण्यासाठी/नियंत्रणासाठी **E.L.C.B.** व **M.C.B.** वापर करावा तसेच आय.एस.आय. मानक असलेली विद्युत उपकरणे वापरावी.

७. विद्युत वायरिंगची रचना सुरक्षीत राखण्यासाठी वेगवेगळे सर्किट करावे व प्रत्येक सर्किट वर कमीत कमी लोड राहील याची खात्री करावी.

८. जनरेटर वापरत असल्यास त्यासंबंधी परवाना विद्युत निरीक्षक-ठाणे, यांच्या कडून घ्यावा, व योग्य क्षमतेचा सुस्थीतील **Change Over Switch** लावावा.

९. कुठल्याही विद्युत उपकरणात शॉक भासल्यास किंवा व्यक्तीला शॉक लागल्यास त्याची सूचना टोरेन्ट पॉवर कार्यालयास द्यावी.

१०. आग लागली असल्यास विजपुरवठा त्वरित बंद करावा.

११. ज्वलनशील पदार्थ, विद्युत उपकरणे व वायरिंग या पासून दूर ठेवावीत.

१२. आगी पासून बचावासाठी मंडपात अग्नीरोधक उपकरणे ठेवावीत.

१३. दर्शनास येणाऱ्या भाविकांचा कोणत्याही विद्युत उपकरणास व वायरींग ला स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४. गणेश मंडपात पशु, पक्षी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

आपली भिवंडी उज्ज्वल भिवंडी

www.torrentpower.com

torrent POWER

रोशन आपला....शील मुम्ब्रा कलवा

अधिक माहितीसाठी हेल्पलाईन नंबरवर संपर्क करा
१८००२६७२२५५ (भिवंडी) / १८००२६७७०९९ (शील मुम्ब्रा कलवा)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, २२ ऑगस्ट २०२२


## ठामपात 'स्वराज्य महोत्सव' अंतर्गत 'समुह राष्ट्रगीत गायन' संपन्न



**ठाणे:** भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात सर्वत्र 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' व 'स्वराज्य महोत्सव' अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले असून बुधवारी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली 'समुह राष्ट्रगीत गायन' पार पडले.

शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सकाळी ठीक ११ वाजता समूह राष्ट्रगीत गायन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, उप आयुक्त मारुती खोडके, उप आयुक्त मनीष जोशी, उप आयुक्त जी.जी.गोदेपुरे, उप आयुक्त वर्षा दीक्षित यांच्यासह महापालिकेचे इतर वरिष्ठ अधिकारी, तसेच महापालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात समूह राष्ट्रगीत गायन उत्साहात संपन्न

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित स्वराज्य महोत्सवअंतर्गत आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात सामूहिक राष्ट्रगीत गायन उत्साहात झाले. जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, उपजिल्हाधिकारी रेवती गायकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## घरोघरी दिलेले व सार्वजनिक ठिकाणी लावले गेलेले राष्ट्रध्वज सन्मानाने जमा करण्यात यावेत!

### भाजप ठाणे शहर उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांचे पंतप्रधान यांना ट्विट

**ठाणे:**-स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव दिनानिमित्त देशात राबवण्यात आलेल्या हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत घरोघरी देण्यात आलेले राष्ट्रध्वज सन्मानाने जमा करण्यात यावेत अशी मागणी भाजपचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे ट्विटर द्वारे केली आहे.

प्रधानमंत्री मोदी यांना केलेल्या ट्विटमध्ये निलेश चव्हाण यांनी आजादी का अमृत महोत्सव यानिमित्ताने राबविण्यात आलेल्या घरोघरी तिरंगा या उपक्रमाचे कौतुक केले आहे व मोदींना याबाबत धन्यवाद दिले आहेत. घरोघरी दिलेले राष्ट्रध्वज व सार्वजनिक ठिकाणी लावलेले राष्ट्रध्वज सन्मानाने जमा करण्यात यावेत. त्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात यावी असे निलेश चव्हाण यांनी प्रधानमंत्री यांना केलेल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

## ठाण्यात ६४ गोविंदा जखमी

### १२ जण उपचारार्थ रुग्णालयात दाखल

**ठाणे: दहीहंडीच्या पंढरीत माखन चाखण्यासाठी आलेल्या गोविंदाचा थर लावताना किंवा नाचताना पडून अन्यथा अन्य कारणाने अपघात झाला असून, त्या अपघातात शुक्रवारी दिवसभरात एकूण ६४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ५२ जणांना प्रथमोपचार करून घरी सोडण्यात आले तर १२ गोविंदांवर रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे, असे ठामपा उपमुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. जखमींमध्ये पाच आणि बारा वर्षीय बालकांचा समावेश आहे.**

ठाणे शहरात शुक्रवारी दिवसभरात गोविंदा पथकांनी वेगवेगळ्या दहीहंडी महोत्सवात सहभाग घेतला, त्यावेळी मानवी मनोरे उभारताना किंवा अन्य कारणास्तव अपघात झाला. त्या अपघातामध्ये ६४ गोविंदांना दुखापत झाले. त्यामध्ये दोन गोविंदांना जिल्हा शासकीय रुग्णालय, ०९ गोविंदांना ठामपाच्या कळवा, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, (पान ४ वर)

## अडीच कोटींच्या हस्तीदंतासह दुकली गजाआड

### ठाणे गुन्हे शाखा घटक १ ची कामगिरी



**ठाणे:** ठाण्यात अडीच कोटी रूपये किंमतीच्या हस्तीदंताची विक्री करण्याकरीता आलेल्या अमित पांडुरंग वरळीकर (४२) आणि सागर विजय पाटील (४०) या दुकलीला ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा, घटक - १ अटक केली. तसेच त्यांच्याकडून सुमारे ३४.५ से. मी. लांबीचे व १.४०० कि.ग्रॅम वजनाचे एक हस्तीदंत जप्त केले आहे. ही कारवाई कळवा नाक्यावर करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

काही जण हस्तीदंताची विक्री करण्याकरीता कळवा परिसरात येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा, घटक १ चे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेने वनविभागाच्या मदतीने कळवा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सापळा रचला होता. मंगळवारी एका दुकलीला संशयास्पद हालचालीवरून ताब्यात घेतले. त्यांची अंगझडतीत त्यांचे ताब्यातील पिशवीमध्ये सुमारे ३४.५ से. मी. लांबीचे व १.४०० कि.ग्रॅम वजनाचे एक हस्तीदंत मिळून आले.त्याची अंदाजे किंमत २ कोटी ५० लाख रुपये इतकी असावी अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. या दुकलीमध्ये अमित हा मुंबई तर सागर हा ठाण्यातील रहिवासी आहे. याप्रकरणी त्यांच्याविरूध्द कळवा पोलीस ठाण्यात वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च कलम ३९, ४४, ४८ (अ), ४९ (अ) (ब), ५०, ५१ गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना अटक करण्यात आले आहे. तसेकंग त्यांनी तो हस्तीदंत कोठून प्राप्त केले होते, यामध्ये इतर कोणाचा सहभाग आहे, याचा तपास गुन्हे शाखा, घटक १ करत आहे. ही कारवाई ठाणे घटक १, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल देशमुख, पोलीस निरीक्षक कृष्णा कोकणी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक निलेश मोरे, संदीप चव्हाण, योगेश काकड, सहायक पोलीस उपनिरीक्षक नरसिंग महापुरे, पोलीस हवालदार भरत आरवंदेकर, विकास लोहार, आशीष ठाकूर, उमेश जाधव, बाळु मुकणे, पोलीस नाईक गणेश बडगुजर, पोलीस शिपाई समीर लाटे, रजनीकांत मोरे या पथकाने केली.

## महिला पोलीस नाईकाची पोलीस ठाण्यातच गळफास घेऊन आत्महत्या

ठाणे: ठाणे शहर पोलीस दलातील पोलीस नाईक अनिता भीमराव वाव्हळ यांनी ड्युटी वर आल्यानंतर श्रीनगर पोलीस ठाण्यातील महिला कक्षेत पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना समोर आली. तर आत्महत्येपुर्वी त्यांनी कोणतीही चिठ्ठी लिहून ठेवली नसल्याने आत्महत्येचे काम अद्यापही पुढे येऊ शकलेले नाही. परंतु घरगुती वादातून त्यांनी आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज श्रीनगर पोलिसांनी वर्तवला आहे.

मयत अनिता वाव्हळ या २००८ साली ठाणे शहर पोलीस दलात रुजू झाल्या होत्या. सद्यस्थितीत त्या श्रीनगर पोलीस ठाण्यात पोलीस नाईक या पदावर कार्यरत होत्या. नेहमीप्रमाणे त्या कर्तव्यावर हजर झाल्या होत्या. परंतु वाव्हळ यांनी पोलीस ठाण्यातच ओढणीने पंख्याला गळफास घेवुन आत्महत्या केल्याचे दिसून आले. प्राथमिक तपासानुसार त्यांनी घरगुती कारणावरून आत्महत्या केल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आलेली असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृष्ण बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# प्रशासन लक्ष देत नसल्याने मुंब्रा देवी कॉलनीतील महिलांनी भाजप महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांच्याकडे मांडला पाणी प्रश्न

## महिलांसह ज्योती पाटील घेणार अधिकाऱ्यांची भेट



**दिवा:**-शहरातील मुंब्रा देवी कॉलनी येथे भीषण पाणीटंचाई नागरिकांना भेडसावत आहे. येथील महिला पाणी समस्येने हैराण आहेत. मुंब्रा देवी कॉलनी मधील शांतीनगर परिसरातील महिलांनी नुकतेच आपल्या समस्या भाजपच्या दिवा महिला मंडळ अध्यक्ष ज्योती पाटील यांच्या कानावर घातल्या. ज्योती पाटील यांनी शांतीनगर भागातील महिलांची भेट घेऊन समस्या जाणून घेतल्या.पाणी समस्या गंभीर असल्याने महिलांचा संपूर्ण दिवस पाणी भरण्यात जात असतो.महिलांना दिवा शहरात अन्य ठिकाणी जाऊन दोन दोन हांडे पाणी आणावे लागते. अनेक इमारती व चाळींमध्ये तीन ते चार दिवस पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांनी प्रशासनाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. भाजपच्या महिला मंडळ अध्यक्षा ज्योती पाटील यांनी महिलांच्या समस्या जाणून घेऊन पालिका प्रशासनाकडे पाणी समस्येबाबत पाठपुरावा करण्याचे आश्वासन या महिलांना दिले आहे.



गुरूदर्शन नगर रहिवाशी संघ (दिवा) यांस कडून दिवा शहराचे कार्यसम्राट, लाडके लोकनेते शैलेश दादा पाटील ह्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना ,नागरिक.यावेळी डॉ. महाजन देखील उपस्थित होते.

## गणेशोत्सव पूर्वी मुंब्रा देवी कॉलनीतील रस्ते दुरुस्त करा,भाजपचे रोशन भगत यांची मागणी



**दिवा:**-दिव्यातील मुंब्रा देवी कॉलनी फेज वन व अन्य मुख्य रस्त्यांची गणपती उत्सवापूर्वी तातडीने डागडुजी करण्यात यावी व खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी भाजपचे रोशन भगत यांनी दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाच्या माध्यमातून पालिकेकडे केली आहे.

भाजपचे दिवा ओबीसी वार्ड अध्यक्ष रोशन भगत यांनी भाजप शिष्टमंडळा सोबत या विषयावर सहायक आयुक्तांची नुकतीच भेट घेतली.दिव्यातील रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत दिवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांना भेटून त्यांना या विषयात लक्ष घालण्याचे आवाहन भाजपने केले आहे.यावेळी दिवा मंडळाच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील आर पी आय कल्याण विधानसभा अध्यक्ष एकनाथ भगत सरचिटणीस समीर चव्हाण व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर त्रिभुवने ताई उमेश जाधव वार्ड अध्यक्ष नागेश पवार अन्य पदाधिकारी उपस्थित होते. दिव्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने गणेशोत्सवापूर्वी येथील खड्डे बुजवण्यात यावेत व गणेशोत्सव आनंदात पार पडावा अशी मागणी रोशन भगत यांनी या निवेदनाद्वारे केले आहे.

# कल्याण-तळोजा मेट्रो मार्ग उभारणीला गती द्या

## - खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची मागणी



**ठाणे: कल्याण - तळोजा या मेट्रो १२ मार्गाच्या कामाला गती देण्याची आग्रही मागणी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. ठाणे - भिवंडी - कल्याण या मेट्रो मार्गाचा हा विस्तारित मार्ग असून यामुळे ठाणे, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, कल्याण ग्रामीणचा भाग आणि तळोजा हे एकमेकांना थेट जोडले जातील. त्याचा नागरी वस्तीसह ग्रामीण भागालाही फायदा होणार आहे.**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून मुंबई आणि उपनगरात विविध मेट्रो मार्गांची उभारणी केली जाते आहे. या मार्गांमुळे प्रवास सुखकर झाला आहे. तर विविध मार्गांवर येत्या काळात प्रवास सोयीचा आणि जलद होणार आहे. ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाचा विस्तारीत भाग असलेल्या कल्याण - डोंबिवली-तळोजा (मेट्रो १२) या मार्गालाही मंजुरी देण्यात आली आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे मेट्रोसाठी आग्रही आहेत. या मेट्रो मार्गामुळे ठाणे शहरातला प्रवासी भिवंडी ते कल्याण आणि कल्याण येथील प्रवासी थेट तळोजा आणि नवी मुंबईला जोडला जाणार आहे. त्यामुळे या मार्गाच्या उभारणीला महत्व प्राप्त झाले आहे. या एकूण २०.७५ किलोमीटरच्या मार्गात १७ स्थानक नियोजीत करण्यात आले आहेत. कल्याण पश्चिमेतील कृषी उत्पन्न बाजार समितीपासून हा मार्ग सुरू होणार आहे. तर पुढे डोंबिवलीतील विविध गावे आणि मानपाडा मार्गे कल्याणच्या ग्रामीण भागातून हा मेट्रो मार्ग जाणार आहे. तळोजा हे या मार्गातील अंतिम स्थानक आहे. या मार्गामुळे शहरी भागासह ग्रामीण भागही मेट्रोला जोडला जाणार आहे. या प्रकल्पासाठी यापूर्वीच सल्लागार समितीची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पाला गती देण्यासाठी सल्लागार समितीला तातडीचे योग्य ते निर्देश द्यावेत आणि कामाला सुरुवात करावी, अशी मागणी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली आहे. त्यासाठीचे लेखी निवेदन त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

# घरांवर ज्यांनी तिरंगा फडकवला त्यांना बेघर होऊ देणार नाही

## डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी रेल्वेच्या प्रबंधकांना दिला इशारा



**ठाणे** – मुंब्रा येथील २२ इमारतींना रेल्वेने नोटीस बजावून त्या रिकाम्या करण्याचे सूचित केले आहे. मात्र, मुंब्राच काय, कल्याण, मुंबईतील एकाही नागरिकांना बेघर होऊ देणार नाही. यापुढे नोटीसच काय, सदर इमारतींच्या जवळपासही फिरकू देणार नाही; ज्या नागरिकांनी हर घर तिरंगा अभियानात सहभाग घेऊन आपल्या घरांवर तिरंगा फडकवला त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये बेघर होऊ देणार नाही, असा इशारा माजी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी मध्य रेल्वेचे मंडल प्रबंधक सलभकुमार गोयल यांची भेट घेऊन दिला.

मुंब्रा रेल्वेस्थानक परिसरातील २२ इमारतींना रेल्वे प्रशासनामार्फत नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. या इमारतींना अचानक नोटीसा बजावण्यात आल्यामुळे लोकांमध्ये संभ्रमावस्था व भीतीचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी रेल्वेच्या मुख्यालयात जाऊन रेल्वे प्रबंधक सलभकुमार गोयल यांची भेट घेतली. या भेटीमध्ये रेल्वे प्रबंधकांनी आणखी नोटीसा बजावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यावर डॉ. आव्हाड यांनी आक्रमक भूमिका घेतली.

डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी रेल्वे प्रबंधक सलभकुमार गोयल यांना सांगितले की, मुंबईतील सुमारे ३० हजार झोपड्या आणि मुंब्रा ते कल्याण दरम्यानच्या शेकडो इमारती पाडण्याचे धोरण रेल्वेचे असले तरी आता ४० वर्षानंतर कोणालाही बेघर करण्याचा अधिकार केंद्र सरकारला नाही. केंद्र सरकारने माणुसकीची कास धरुन नागरिकांना बेघर करु नये. तसा प्रयत्न झाला तर इमारतींच्या आसपासही रेल्वेच्या प्रशासनाला फिरकू देणार नाही. फारफार तर गोरगरीबांवर गोळीबार कराल; पण, त्यापेक्षा अधिक काही आपण करणार नाहीत; त्यामुळे या नोटीसा रद्द कराव्यात, अशी मागणीही डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केली. त्यावर रेल्वे प्रबंधकांनी याबाबत वरिष्ठांना कळविण्यात येणार असून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

मुंब्रा रेल्वे स्थानकामध्ये सरकते जिने बसविण्याच्या कामाला सुरुवात झाली होती. हे काम थांबले असल्याचे डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी रेल्वे प्रबंधकांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर सदरच्या कामाला न्यायालयीन स्थगिती असल्याचे प्रबंधकांनी सांगितल्यानंतर न्यायालयीन तिढा संपला असल्याची बाब डॉ. आव्हाड यांनी स्पष्ट केली. त्यानंतर सदरचे काम लवकरच सुरु करण्यात येणार असून येत्या दिवाळीपर्यंत मुंब्रा रेल्वे स्थानकातील सरकते जिने कार्यान्वित होतील, असे रेल्वे प्रबंधक सलभकुमार गोयल यांनी डॉ. आव्हाड यांना सांगितले.

रेतीबंदर येथे पादचारी पुलाचे काम थांबले असल्याने रेल्वे अपघातात अनेकांचे मृत्यू होत आहेत, हे काम तत्काळ सुरु करावे, अशी मागणी डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केली. या मागणीनंतर रेल्वे प्रबंधकांनी, सदर ठिकाणी होणार्या अपघातांची माहिती आम्हाला आहे. काही काळापूर्वी रेतीबंदर येथील रेल्वे पादचारी पुलाचे काम सुरु झाले होते. मात्र, काही कारणास्तव ते बंद झाले होते. मात्र, आता हे काम सुरु करण्यात येणार असून लवकरच हा पादचारी पुल उभारुन नागरिकांसाठी खुला करण्यात येणार असल्याचेही रेल्वे प्रबंधकांनी सांगितले.

# आता सर्व सण होणार जोरात साजरे

## देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर साधला निशाणा

**ठाणे** : आता गोविंदा जोरात...गणेशोत्सव जोरात... नवरात्रोत्सव जोरात.... आता सर्वच काही जोरात, अशी टीका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता ठाण्यातील डॉ काशिनाथ घाणेकर चौकात केली.

स्वामी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या दहीहंडी उत्सवाला सायंकाळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी हजेरी लावली, यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी त्यांच्यासोबत विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर, संजय केळकर,निरंजन डावखरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना, फडणवीस यांनी आता तुम्ही गोविंद नाही, तर खेळाडू आहात राज्य सरकारने दहीहंडी उत्सवाला स्पर्धेत सहभागी केले असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील वर्षी प्रो गोविंदा ही आयोजित केला जाणार आहे, दहा लाखांचा विमा कवचही सरकारच्या वतीने देण्यात आले आहे, तरीसुद्धा सावधतेने खेळा चांगले थर लावा असाही सल्ला त्यांनी यावेळी गोविंदा पथकांना दिला. दहीहंडीतला मखन हे प्रत्येकापर्यंत पोहोचवायचं आहे असंही त्यांनी सांगितले. प्रत्येक कापर्यंत महाराष्ट्रातल्या हंडीचा विकास पोहोचवायचा आहे तसेच हंडी प्रत्येकाची आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

# दिव्या स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण व्हावे यासाठी भाजपचे रोहिदास मुंडे घेणार देवेंद्र फडणवीस यांची भेट

**दिवा**:–शहरासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण करण्यात यावे या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी दिवा विभागाच्या वतीने उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लवकरच भेट घेतली जाणार असल्याचे दिवा भाजप मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी सांगितले.

दिवा शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे असावे अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून येथील नागरिक करत आहेत. नागरिकांची ही मागणी लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी दिवा शहराच्या वतीने उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या वतीने शिष्टमंडळ भेट घेणार आहे. सध्या दिवा शहरात मुंब्रा पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस चौकी असून येथील पोलीस कर्मचाऱ्यांवर येणारा ताण लक्षात घेऊन दिव्यासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे उभारणे गरजेचे असल्याचे भाजपचे रोहिदास मुंडे यांनी सांगितले. दिव्यात पोलीस ठाणे होण्यासाठी भाजपच्या माध्यमातून आपण प्रयत्न करणार असल्याचे रोहिदास मुंडे म्हणाले. मुख्य पोलीस ठाणे मुंब्रा येथे असल्याने दिव्यातील सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या तक्रारी अडीअडचणी सोडवण्यासाठी मुंब्रा येथे जावे लागते. नागरिकांची ही गैरसोय टाळण्यासाठी दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे असावे अशी मागणी भाजपच्या वतीने करण्यात येणार असल्याचे रोहिदास मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# ‘उत्सव ७५ ठाणे’ महोत्सवाने ठाणेकरांना अधिक प्रगल्भ केले – डॉ. विनोद इंगळहळीकर

**ठाणे** : भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव हा ठाणे शहरात विविध कार्यक्रमांनी साजरा झाला ही अद्वितीय अशी घटना आहे. कमी दिवसात ‘उत्सव ७५ ठाणे’चा घाट घालणे सोपे नाही. एक शहर, पंचाहत्तर वर्षे, साठ संस्था, वीस ठिकाणी, पंचाहत्तर कार्यक्रम तीन दिवस साजरे करुन ठाणे शहराने खऱ्या अर्थाने अमृतमहोत्सव साजरा केला असल्याचे सांगत ठाणेकरांना अधिक प्रगल्भ व्हायला हा महोत्सव मोलाचा ठरला असल्याचे उद्गार उत्सव ७५ ठाणेच्या समारोप सोहळ्यात नामवंत डॉ. विनोद इंगळहळीकर यांनी काढले. उत्सव ७५ ठाणे या महोत्सवाचा समारोप सोमवारी (१५ ऑगस्ट) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक येथे पार पडला. यावेळी उत्सव ठाणे ७५ चे स्वागताध्यक्ष नरेश म्हस्के, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त बाळासाहेब चव्हाण, शासनाच्या पर्यटन विभागाचे प्रतिनिधी, उत्सव ७५ ठाणेचे संजीव ब्रह्मे आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्षा निमित्ताने गुजराती समाज मंडळ व आशिर्वाद हॉस्पिटलच्या वतीने मोफत मेडिकल चेकअप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याशिबिराचे उद्घाटन भाजप दिवा मंडळाच्या महिला अध्यक्षा सौ ज्योती पाटील यांच्या हस्ते पार पडले.यावेळी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# काँग्रेसचे ठाण्यात 'आरे वाचवा' आंदोलन

## ऐन्य वेळी आंदोलनाचे ठिकाण बदलले




## २० ते २५ कार्यकर्त्यांना घेतले ताब्यात

**ठाणे :** आरे जंगलात होणाऱ्या मेट्रो कारशेडला विरोधात रविवारी सकाळी काँग्रेसच्या पर्यावरण विभाग ठाण्यात रस्त्यावर उतरत त्यांनी आरे वाचवा यासाठी आंदोलन केले. हे आंदोलन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील शुभ दीप या निवासस्थानासमोर होणार होते. मात्र कायदा-सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी परवानगी नाकारल्याने ऐन्य वेळी हे आंदोलन कॅडबरी जंक्शन येथे करण्यात आले. यावेळी पोलिसांनी २० ते २५ आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले होते.

राज्य सरकार आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) आरेच्या जंगलात कारशेड उभारण्यावर ठाम असल्याने आरे कारशेडला मोठा विरोध होत आहे. पर्यावरण संघटना आणि विविध राजकीय पक्षांपाठोपाठ रविवारी काँग्रेसच्या पर्यावरण विभागानेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन आयोजित केले होते. पण, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर काँग्रेसने शिंदे यांच्या निवासस्थानापासून सुमारे ५०० मीटर अंतरावरील कॅडबरी जंक्शन येथे आंदोलन केले. यावेळी आरे वाचवा अशी घोषणाबाजी केली. दरम्यान पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले होते.

**दिवा शहरात सर्वाधिक वितरित होणारे व चर्चिले जाणारे स्थानिक वर्तमानपत्र**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
**दिवा न्यूज**

**दुसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे!**

**२९ ऑगस्ट** रोजी प्रसिद्ध होतोय **दिवा न्यूज**चा वर्धापन दिन **विशेष अंक व गणेशोत्सव अंक!**

प्रति
____________
____________

महोदय,

**दिवा न्यूज** या दिवा शहरातील पहिल्या वर्तमानपत्राला बघता बघता १वर्षे पूर्ण झाले आणि दिवा न्यूज दुसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. **२९ ऑगस्ट रोजी दिवा न्यूजचा प्रथम वर्धापन दिन विशेष अंक प्रसिद्ध होत आहे.**

दिवा शहरातील मान्यवरांच्या मुलाखती,सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांची मनोगते, नागरिकांचे लेख या विशेष अंकात प्रसिध्द होणार आहेत. **दिवा न्यूज हे दिवा शहरात सर्वाधिक वितरित होणारे स्थानिक वर्तमानपत्र असून या लोकप्रिय वर्तमानपत्रात** आपण वर्धापनदिन निमित्त आपल्या संस्थेची,व्यवसायाची शुभेच्छा जाहिरात देऊन सहकार्य करावे ही विनंती. सर्व वाचक हितचिंतक आणि जाहिरातदार यांच्या सहकार्याने दिवा शहरातून प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज हे वर्तमानपत्र यापुढे दिवा शहराचा आवाज म्हणून वाटचाल सुरू ठेवेल!

– संपादक
**दिवा न्यूज**

| जाहिरातीचे दर | | |
|---|---|---|
| पूर्ण पान कलर | – | १५ हजार |
| अर्धे पान कलर | – | ८ हजार |
| पाव पान कलर | – | ४ हजार |
| शुभेच्छा जाहिरात | – | १ हजार |

**जाहिरातीसाठी संपर्क :-**
९३२६१६५५४२

# खास चाकरमान्यांसाठी कोकण रेल्वे मार्गावर २७२ गाड्या धावणार

**रत्नागिरी (एम.एम.काझी):-** अवघ्या १० दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी रेल्वे महामंडळाने कोकण खास चाकरमान्यांच्या सोयीकरता सुमारे २७२ जादा गाड्या सोडल्या आहेत. शिवाय ३२ गाड्या नियमित आहेत. जादा गाड्यांमध्ये आणखी वाढ होणार आहे. बहुतांशी जादा गाड्यांचे आरक्षण झाले असून येत्या २७ ऑगस्टपासून चाकरमान्यांचा ओघ जिल्ह्यात सुरू होणार आहे.

ज्याप्रमाणे पंढरपूरच्या आषाढी-कार्तिकी वारीला लाखोंच्या संख्येने वारकरी दरवर्षी जातात त्याप्रमाणे कोकणातील गणेशोत्सावासाठी लाखोंच्या संख्येने चाकरमानी मुंबई तसेच विविध भागातून आपापल्या गावी येतात. पूर्वी चाकरमान्यांचा प्रवास हा केवळ एसटी गाड्यांवरच अवलंबून होता मात्र कोकण रेल्वे धावू लागल्या नंतर चाकरमान्यांचा ओढा कोकण रेल्वेकडे वळला. अर्थात एसटीच्या गाड्यानींही मोठ्या संख्येने चाकरमानी गणेशोत्सवाला येतात.

दरवर्षी कोकण रेल्वे एसटी महामंडळाप्रमाणेच चाकरमान्यांच्या सोयीसाठी मध्य आणि पश्चिम महामार्गावरून जादा गाड्या सोडते. यावर्षीही मोठ्या संख्येने कोकण रेल्वे मार्गावर ज्यादा गाड्या सोडल्या आहेत. नियमित गाड्यांबरोबरच हॉलीडे स्पेशल तसेच अन्य गाड्यांचा समावेश आहे. या बहुतांशी गाड्यांचे आरक्षण आता पूर्ण होत आले आहे. शिवाय कोकण रेल्वेने एसटी महामंडळाशी समन्वय साधत चिपळूण, रत्नागिरी, राजापूर, वैभववाडी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी या महत्वाच्या स्थानकांवर उतरणाऱ्या चाकरमान्यांना त्यांच्या गावापर्यंत थेट जाण्यासाठी एसटी बसेस सोडण्याच्या सूचना केल्या आहेत. २७ ऑगस्ट पासून खऱ्याअर्थाने चाकरमानी गावाला येण्यास सुरूवात होणार आहे. चाकरमान्यांच्या स्वागतासाठी स्थानिक प्रशासन पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे.




## मंडणगडमध्ये विजेचा शॉक लागून गाय आणि वासराचा मृत्यू

**राजापूर -** राजापूरात विजेचा शॉक लागून प्रौढाचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच आता दोन जनावरांना विद्युतभारीत वायरचा शॉक लागून गाय आणि वासराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

मंडणगड तालुक्यातील पुंबळे येथे तुटून पडलेल्या विद्युत तारेला स्पर्श झाल्याने गायीचा आणि वासराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी पहाटे ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

गुरूवारी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी परिसरात साफसफाई केली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी ग्रामस्थ हमीद कडवेकर हे आपल्या गुरांना चरवायला नेत असताना गाय व वासराला तुटून पडलेल्या विद्युतभारीत तारेचा शॉक लागला. यामध्ये दोन्ही गुरे जागीच ठार झाली. गुरे दगावलेल्या मालकांला नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आता केली गेली आहे.

## रोहा ते चिपळूण या मार्गावर पहिली मेमू ट्रेन दाखल

**चिपळूण:-** कोकणात येणार्या गणेशभक्तांच्या सोयीसाठी शुक्रवारी रोहा ते चिपळूण या मार्गावर पहिली मेमू ट्रेन दाखल झाली. शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही गाडी चिपळूण रेल्वे स्थानकात दाखल झाली तर दुपारी १.४५ वा. पुन्हा दिव्याकडे मार्गस्थ झाली. गणेशभक्तांसाठी ही गाडी सुरू करण्यात आली असून एकूण ३२ फेर्या मारणार आहे. या गाडीमुळे चाकरमान्यांना अवघ्या ९० रूपयांत चिपळूणपर्यंत प्रवास होणार आहे.

दरवर्षी गणेशोत्सव, शिमगोत्सवामध्ये चिपळूण, खेडमधील प्रवाशांची मोठी गैरसोय होते. सिंधुदुर्ग, गोव्याकडून येणार्या गाड्यांमध्ये चिपळूण, खेड स्थानकातील प्रवाशांना आतमध्ये शिरता येत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन या वर्षी दिवा-रोहा-चिपळूण मार्गावर मेमू रेल्वेगाडी सुरू करण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या माध्यमातून ही गाडी सोडण्यात येणार आहे. गाडी क्र. ०११५७ चिपळूणपर्यंत येईल तर चिपळूण स्थानकातून १.४५ वा. ०११५८ क्रमांकाची गाडी रोहा-दिव्याच्या दिशेने जाईल.

ही गाडी माणगाव, वीर, करंजाडी, विन्हेरे, खेड व चिपळूण अशी थांबेल. गणेशभक्तांच्या सोयीसाठी ही गाडी महत्वाची ठरणार असून पहिल्या दिवशी गाडी चिपळूण स्थानकात दाखल झाली. मात्र, या दिवशी गोपाळकाला असल्याने प्रवाशांचा फारसा प्रतिसाद लाभला नाही. पुढील काळात गाडीला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा मध्य व कोकण रेल्वे प्रशासनाकडून व्यक्त होत आहे.

## परशुराम घाट २४ तास वाहतुकीसाठी होणार खुला

**चिपळूण:-** जुलै महिन्यांपासून विस्कळीत असलेली मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटातील वाहतूक आता २४ तास सुरू ठेवण्यास राष्ट्रीय महामार्गाच्या महाड व चिपळूण उपविभागाने हिरवा कंदील दाखवला आहे. या संदर्भातील दोन्ही विभागाचे अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आलेले असून येत्या दोन दिवसांत घाट सुरू करण्याबाबतचा निर्णय होणे अपेक्षित आहे. जोरदार पावसात दरडी कोसळल्याने तसेच माथ्यावरील परशुरामच्या डोंगराला भेगा गेल्याने ५ जुलैपासून या घाटातील वाहतूक विस्कळीत झाली आहे. १४ जुलैपासून अटी - शर्तींवर केवळ अवजड वाहनांच्या एकेरी मार्गासाठी हा घाट सुरू करण्यात आला होता. त्याच दिवशी सायंकाळी ७ नंतर घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला. सध्या पावसाने काहीशी विश्रांती घेतली असून गणेशोत्सवही जवळ येऊन ठेपला आहे. त्यामुळे २४ तास घाट सुरू करण्यासंदर्भात महाड व चिपळूण महामार्ग उपविभागाकडे अहवाल मागवण्यात आले होते.

# जिल्ह्यात पोलीस कायदा कलम ३७ (१ ) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी

**रत्नागिरी:-** राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता दोन गटांचे कार्यकर्ते राज्यभरात आक्रमक झाले असून आगामी काळात जिल्ह्यातील दोन गटांचे कार्यकर्ते एकमेकांसमोर येवून कायदा व सुव्यवस्थेस बाधा पोहोचण्याची दाट शक्यता आहे.

३१ ऑगस्ट २०२२ ते ०९ सप्टेंबर २०२२ रोजी गणेशोत्सव सण साजरा करण्यात येणार आहे. त्यादरम्यान मोठया प्रमाणात चाकरमानी कोकणात येणार आहेत. त्यादरम्यान त्यांच्यातील जुने वादविवादावरुन भांडणतंटा होऊन कायदा व सुव्यवस्थेस बाधा पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच रत्नागिरी जिल्हयात राजापूर तालुक्यातील बारसू, सोलगाव, वरचीवाडी गोवळ, खालचीवाडी गोवळ व आजूबाजूच्या परिसरात रिफायनरी प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पास तेथील काही गावच्या स्थानिकांचा विरोध असून त्यानुषंगाने मागील सहा महिन्यांपासून वेगवेगळया स्वरुपात आंदोलने करुन विरोध दर्शविण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने देखील कायदा व सुव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आवश्यक आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्हयात कोणत्याही प्रंसगी क्षुल्लक कारणावरुन झालेल्या घटनांचे पडसाद उमटून कायदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरिता जिल्हयात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात येत आहे. अपर जिल्हादंडाधिकारी रत्नागिरी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सन १९५१ चा कायदा २२ वा नुसार २२ ऑगस्ट २०२२ रोजी चे ००.०१ वा. पासून ते ०५ सप्टेंबर २०२२ रोजी २४.०० वाजेपर्यंत जिल्हयात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे या आदेशान्वये वरील कालावधीत खालील कृत्य करण्यास मनाई करणेत येत आहे.

शारीरीक दुखापती करण्यासाठी वापरता येतील अशी हत्यारे, सोटे, तलवारी, बंदुका, सुरे, लाठ्या अगर कोणतीही वस्तू घेवून फिरणे, अंग भाजून टाकणारा कोणताही दाहक किंवा स्फोटक पदार्थ घेवून फिरणे, दगड किंवा इतर शस्त्रे, हत्यारे किंवा शस्त्रे फेकावयाची साधने बरोबर घेवून फिरणे, गोळा करणे किंवा तयार करणे, सभ्यता अगर निती याविरुध्द अशी किंवा शांतता धोक्यात येईल अशी भाषणे करणे, अगर सोंग आणणे, अगर कोणतीही वस्तू किंवा जिन्नस तयार करणे व लोकांत प्रसार करणे. इसम अगर प्रेते किंवा आकृती यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी गाणे, वाद्य वाजविणे, पाच किंवा पाचपेक्षा जास्त इसमांनी विनापरवानगी एकत्र येणे या कृत्यांना मनाई करण्यात आली आहे.

सदरचे आदेश अंत्ययात्रा, धार्मिक विधी, लग्नसोहळा, सामाजिक सण, शासकीय कार्यक्रम इत्यादी, शासकीय सेवेत तैनात कर्मचारी, सार्वजनिक करमणुकीची सिनेमागृह, रंगमंचा इत्यादी या बाबीना लागू होणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

प्रतिबंधात्मक आदेशाच्या काळात कोणताही मोर्चा, मिरवणूका तसेच सभेचे आयोजन करावयाचे झाल्यास संबंधित उपविभागीय दंडाधिकारी यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे व अशी परवानगी घेतल्यानंतरच उपरोक्त प्रतिबंधात्मक आदेश लागू होणार नाही, असे अपर जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांनी आदेशीत केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज


# शिधावाटप कार्यालयाची वाटचाल आयएसो मानांकनाच्या वाटचाल

## आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने वास्तूला झळाळी

**ठाणे** : गेली अनेक वर्षे पडझड झालेल्या चाळवजा वास्तूत हजारो सर्वसामान्य नागरिकांना सेवा देणारे शिधावाटप कार्यालय आयएसओ मानांकनाच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे. आमदार संजय केळकर यांनी पुढाकार घेत सार्वजनिक बांधकाम विभागाला कामाला लावल्याने जीर्ण-पडके कार्यालय आता झळाळून निघाले आहे.

गेली अनेक वर्षे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कॅम्पसमध्ये चाळवजा वास्तूतील शिधावाटप कार्यालय अनेक सोयी-सुविधांपासून वंचित होते. गळके छप्पर, माती गळत असलेल्या भिंती, कोंदट वातावरण आदी समस्यांनी हे कार्यालय, या कार्यालयातील कर्मचारी आणि येथे रोज दैनंदिन कामासाठी येणारे शेकडो शिधापत्रिका धारक त्रस्त होते.



या वास्तूच्या दुरुस्तीबाबत पीडब्ल्यूडी विभागही पुढे येत नव्हते, त्यामुळे येथील कार्यक्षमतेवर आणि पर्यायाने नागरिकांच्या सेवेवरही परिणाम होत होता. आमदार संजय केळकर यांनी या कार्यालयातील समस्यांची आणि गरजांची माहिती घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि आयएसओ मानांकनाच्या दृष्टीने संपूर्ण दुरुस्तीचा आराखडा तयार करण्यात आला. या कार्यालयातील भिंतींचे नव्याने प्लास्टर करून रंगरंगोटी करण्यात आली आहे. नवे छप्पर बसवण्यात आले आहे. भिंतींना टाईल्स बसवण्यात आल्या आहेत. नवीन विजेची उपकरणे बसवून नव्याने वायरिंग करण्यात आली आहे. खाली लाद्या बसवून त्यावर कार्पेट अंथरण्यात आले आहे. शौचालये, स्वच्छता कक्ष तयार करण्यात आले आहेत. संपूर्ण कार्यालयाचे पेस्ट कंट्रोल करण्यात आले आहे. ट्रेझरी विभागाची जुनी तिजोरी त्या विभागाने हटवून नष्ट केली आहे. नवीन फलक आणि अभिलेख भिंतींवर लावण्यात आले आहेत. शॉर्ट सर्किट होऊन धूर येऊ लागल्यास त्याची तत्काळ माहिती मिळून उपाय योजना करता यावी म्हणून स्मोक डिटेक्टर आणि अग्निशामक नळकांडे बसवण्यात आले आहे. आमदार केळकर यांनी संगणकही उपलब्ध करून दिले आहेत. या कार्यालयात शिधापत्रिकेबाबत कामे करण्यासाठी रोज शेकडो नागरिक येत असतात. त्यांना बसण्यासाठी आसनव्यवस्थाही करण्यात आली आहे. काही महिलाही त्यांच्या लहान मुलांना घेऊन येत असतात. त्यांची अडचण होऊ नये म्हणून स्वतंत्र हिरकणी कक्षही तयार करण्यात आला आहे. याबाबत शिधावाटप निरीक्षक एस.आर.चव्हाण म्हणाल्या, इतिहासात प्रथमच शिधावाटप कार्यालय सुशोभित आणि सर्व सुविधायुक्त झाले आहे. हा बदल लोकाभिमुख असून नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. आमदार संजय केळकर यांनी पुढाकार घेतल्यानेच हे शक्य झाले असून हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आयएसओ मानांकनाच्या दृष्टीने सर्व बदल करण्यात आले आहेत. पारदर्शी आणि संपूर्ण संगणकीकृत कारभार सुरू केला आहे. शिधापत्रिका संदर्भात विविध कामांसाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ७५व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जनजागृतीसह विविध उपक्रम हाती घेण्यात आले होते, अशी माहिती चव्हाण यांनी दिली.

# महापालिका शाळेत शाडू माती पासून गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा संपन्न

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या प्रदुषण नियंत्रण कक्ष, शिक्षण विभाग आणि पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका शाळा तसेच इतर शाळांमध्ये शाडू माती पासून गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा झाली. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यशाळा ठाणे महानगरपालिकेच्या सहा शाळांमध्ये घेण्यात आल्या. त्यात एकूण २१८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच पालिकेच्या विविध भागातील इतर शाळांनीही या कार्यशाळेत सहभाग नोंदविला. त्यात इतर पाच ५ शाळेतील १९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यासोबतच पर्यावरण आपुलकी जपणाऱ्या सामान्य नागरिकांसाठीही दोन ठिकाणी ही कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यापैकी श्रीराम व्यायामशाळा, ठाण्यातील कार्यशाळेत २१ सभासदांनी भाग घेतला, तर पर्यावरण शाळा येथील कार्यशाळेत १० सभासदांनी भाग घेतला. आजपर्यंत एकूण १३



कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, शिक्षकेत्तर वृंद आणि सर्वसामान्य लोकांनी सहभाग घेतला. २७ ऑगस्ट पर्यंत पर्यावरण दक्षता मंडळ आणि ठाणे महापालिका, ठाणे परिसरात शाडू माती पासून गणेशमूर्ती बनविणे आणि जनजागृती कार्यक्रम एकूण ३० शाळांमध्ये घेणार आहेत. या कार्यशाळांचा अवधी २ तासांचा आहे.

मुलांना शाडु माती पुरविण्यात येते आणि पर्यावरण दक्षता मंचच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्याकडून मुर्ती तयार करून घेण्यात येते आणि मुलांना शाडू मूर्ती वापरण्याचे प्रयोजन आणि जनजागृती करण्यात येते. आपल्या संस्कृतीत निसर्गातून घेतलेले निसर्गाला परत करण्यालाही तेवढेच महत्त्व आहे. निसर्गातून जसे घेतले तसेच ते परत केले, तरच निसर्गचक्र पूर्ण होऊ शकते. निर्माल्याचे विघटन होऊन ते पुन्हा निसर्गात जाऊ शकते, पण मातीचे काय? जी माती जिथून काढली तिथेच ती परत जायला हवी. पण असे होताना दिसत नाही. त्यामुळे हा नैसर्गिक घटक जपून वापरला गेला पाहिजे. यासाठी जेवढे शक्य होतील तेवढी लहानात लहान आणि नैसर्गिक रंगाने रंगविली मूर्ती बनवून तिची प्रतिष्ठापना केली पाहिजे. शाडू मातीची मूर्ती लवकर विरघळते आणि ती माती पाण्याखाली जाऊन बसते हे सर्वसामान्यांना पर्यंत या जनजागृतींत सांगण्यात आले. हे लक्षात आल्यावर शाडूमाती पासून बनवलेली मूर्ती जरी लवकर पाण्यात विरघळत असली तरी वाहत्या पाण्यात विसर्जित न करता घरच्या घरी छोटा कृत्रिम तलाव तयार करून तेथे मूर्तीचे विसर्जन करावे. एखाद्या दिवसात संपूर्ण माती विरघळते आणि तळाशी जाऊन बसते. ती माती पाणी नितळ झाल्यावर वेगळी करून ठेवल्यास पुढच्यावर्षी आपण त्याच माती पासून मूर्ती तयार करू शकतो असे सांगितले. विविध रासायनिक रंगांनी रंगवलेल्या पीओपीच्या गणपतीच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध आहेत. या मूर्ती खूपच आकर्षक असतात. या गणेशमूर्तीसाठी वापरल्या जाणाऱ्या रंगामध्ये शिसे, क्रोमियम, आयर्न यांसारखे अतिशय हानिकारक घटक मिसळलेले असतात. ठाणे महापालिका क्षेत्रात पर्यावरण पुरक गणपती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, मूर्ती स्विकृती केंद्रे, खाडीचे घाट याठिकाणी सुविधा करण्यात येते. विसर्जनाच्या वेळी होणारे गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी App द्वारे Time Slot Booking ची सुविधा देण्यात आली आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन महापालिका आयुक्तांनी केले आहे.

# लोकनेते शैलेश पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिवा शहरातील हजारो विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले. त्याचबरोबर समाजसेवक कैलेश पाटील यांच्या वतीने मुंब्रा देवी कॉलनी येथे गरजूंना धान्य वाटप करण्यात आले. दरवर्षी शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिवा शहरातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सरसकट मोफत वह्या वाटप करण्यात येते. यावेळी हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शैलेश पाटील यांचे समर्थक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



















